जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 MAY 2026
लोकमत

Estd. 1962

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## ADVERTISEMENT NO. 04/2026 & 05/2026

Applications are invited for the posts of Professor of Bank of India Chair and Professor of Bhagwan Mahavir Chair in the prescribed form available online on Shivaji University website www.unishivaji.ac.in (URL www.unishivaji.ac.in/recruitments).

| Sr. No. | Advertisement No. | Chair |
|---|---|---|
| 1. | 04/2026 | Bank of India Chair |
| 2. | 05/2026 | Bhagwan Mahavir Chair |

The details of post, qualifications, age, pay, and emoluments, process of online application form and the instructions therein etc. are available on the university website www.unishivaji.ac.in (URL www.unishivaji.ac.in/recruitments).

- Interested candidates may apply Online on or before 30/06/2026 upto 12.00 midnight.
- Last date for submission of hard copies of application form is 07/07/2026 up to 6.00 p.m. in the University office.

Kolhapur.
Date : 30/05/2026

Dr. V. N. Shinde
Registrar

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2026
पुढारी

Estd: 1962
"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## Advertisement for Teaching / Teaching Equivalent Posts

### ADVERTISEMENT NO. 06/2026 to 11/2026

## WALK IN INTERVIEW

Applications are invited for the various Teaching / Teaching Equivalent Posts in the prescribed form available online on Shivaji University website www.unishivaji.ac.in (URL www.unishivaji.ac.in/recruitments) for the following Departments / Schools / Centers of this University.

| Sr. No. | Advertisement No. | Departments / Schools / Centers |
|---|---|---|
| 1 | 06/2026 | Department of Music and Dramatics (Temporary Accompanist) |
| 2 | 07/2026 | School of Engineering and Technology (Temporary Assistant Professor) |
| 3 | 08/2026 | Center for Distance and Online Education (Temporary Course Co-ordinator ) |
| 4 | 09/2026 | Center for Distance and Online Education (Temporary Co-ordinator and Mentor) |
| 5 | 10/2026 | Various Departments, Self-Supporting Programme, Schools, Center for Distance and Online Education (Temporary Assistant Professor and Coach) |
| 6 | 11/2026 | Center for Distance and Online Education (Temporary Associate Professor) |

All these posts will be filled on purely temporary basis for the academic year 2026-27 as per provisions under section 103 of Maharashtra Public Universities Act, 2016.

The details of posts, qualifications, age, pay and emoluments, process of online application form and the instructions therein etc. are available on the University website: www.unishivaji.ac.in (URL www.unishivaji.ac.in/recruitments).

- Interested candidates may apply Online on or before 10/06/2026 upto 12.00 midnight.

**Kolhapur.**
**Date: 30/05/2026**

**Dr. V. N. Shinde**
**Registrar**

विद्यापीठ, कोल्हापूर

# शिक्षणाला 'एआय'ची जोड दिल्यास यशस्वी करिअर

## कुलगुरू डॉ. आर.के.कामत; दै. 'पुढारी' आयोजित 'एज्यु-दिशा' शैक्षणिक प्रदर्शनाचे थाटात उद्घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

आधुनिक तंत्रज्ञानाच्या बदलत्या काळात चॅट-जीपीटी कालबाह्य झाले असून त्याच्यापुढील नवीन 'एआय' आले आहे. यातून अनोख्या गोष्टी शिकायला मिळत आहेत, ही नव्या युगाची नांदी आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) सर्व काही नसून पारंपरिक बीए, बीकॉम अभ्यासक्रमाबरोबरच इंजिनिअरिंग, मेडिकल यांसारख्या विद्या शाखा तेवढ्याच महत्त्वाच्या आहेत. त्याला 'एआय'ची जोड दिल्यास यशस्वी करिअर शक्य आहे, असा मौलिक सल्ला शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांनी विद्यार्थ्यांना दिला.

दै. 'पुढारी' आयोजित 'एज्यु-दिशा २०२६' शैक्षणिक प्रदर्शनाचे शनिवारी राजारामपुरीतील डॉ. व्ही. टी. पाटील सभागृहात थाटात उद्घाटन झाले. याप्रसंगी ते बोलत होते. शैक्षणिक प्रदर्शनाचे संजय घोडावत युनिव्हर्सिटी, कोल्हापूर हे मुख्य प्रायोजक आहेत. पावर्ड बाय प्रायोजक म्हणून 'विश्वकर्मा युनिव्हर्सिटी, पुणे आहेत. सहयोगी प्रायोजक म्हणून एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी तर एमआयटी एडीटी युनिव्हर्सिटी पुणे, भारती विद्यापीठ डीम्ड युनिव्हर्सिटी, चाटे ग्रुप हे सहप्रायोजक आहेत.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या



कोल्हापूर : दै. 'पुढारी' आयोजित 'एज्यु-दिशा-२०२६' शैक्षणिक प्रदर्शनाचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. आर. के. कामत. समवेत संजय घोडावत विद्यापीठाचे व्यवस्थापकीय संचालक विनायक भोसले, प्रा. राहुल माटे, डॉ. राजेश कंठे, अनुपसिंग, प्रा. भारत खराटे, डॉ. उल्हास माळवदे, दै. 'पुढारी'चे सहायक समूह सरव्यवस्थापक अमित डिक्कर, दै. 'पुढारी'चे सरव्यवस्थापक (ऑपरेशन्स) राजेंद्र मांडवकर, दै. 'पुढारी'चे कार्यकारी संपादक विजय जाधव आदी. (छाया : पप्पू अत्तार)

मतानुसार एकाच पद्धतीने विचार करणे आता कालबाह्य झाले आहे.

तंत्रज्ञानाच्या युगातील पिढी मल्टीटास्किंग करणारी आहे. परंतु यात काही फायदे व तोटे आहेत. शाळा, कॉलेजवर जास्त अवलंबून न राहता उपलब्ध मोफत साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांनी नावीन्यपूर्ण विचार करायला शिकले पाहिजे.

सोशल मीडियावर किती वेळ घालवायचा याला मर्यादा असायला हव्यात. हे नवे माध्यम तुमचा वापर करून घेत आहे, यातून आनंद मिळाल्याने ॲडिक्ट होत आहोत. आजच्या पिढीचा रिटेंन्शन व अटेंशन स्पॅन खूप कमी झाला आहे.

अटेंशन स्पॅन वाढविण्यासाठी अभ्यासाबरोबर सामान्य ज्ञान मिळवणे, वर्तमानपत्र वाचन महत्त्वाचे आहे. जग व भोवतालचा परिसर सुंदर आहे. परंतु ध्येयाकडे वाटचाल करताना स्वतःमध्ये रोज थोडा थोडा बदल करीत जाणे काळाची गरज आहे, असेही ते म्हणाले.

दै. 'पुढारी'चे कार्यकारी संपादक विजय जाधव यांनी 'एज्यु-दिशा' शैक्षणिक प्रदर्शन आयोजनामागील उद्देश स्पष्ट केला. ते म्हणाले, 'एज्यु-दिशा' प्रदर्शनाच्या माध्यमातून शिक्षणाचा महाकुंभ भरला आहे. सध्याच्या शैक्षणिक क्षेत्रातील गोंधळाच्या परिस्थितीमुळे विद्यार्थी, पालकांच्या मनात भविष्याबद्दल साशंकता आहे. त्यामुळेच अशा शैक्षणिक करिअर मार्गदर्शन शिबिरांची गरज आहे. यात 'पुढारी'ने खारीचा वाटा उचलला आहे. आजचे विद्यार्थी नव्या पिढीचे नायक आहेत. त्यांना बोट धरून दिशा दाखविण्याचे काम 'एज्यु-दिशा'च्या माध्यमातून होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दै. 'पुढारी'चे विभागीय जाहिरात व्यवस्थापक शशिकांत पोवार यांनी आभार मानले. यावेळी विश्वकर्मा युनिव्हर्सिटी पुणेच्या मीडिया आणि कम्युनिकेशन विभागाचे प्रा. राहुल माटे, भारती विद्यापीठ डीम्ड टू बी युनिव्हर्सिटीचे संचालक डॉ. राजेश कंठे, एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी सोलापूरचे ॲडमिशन अँड आऊटरीच प्रमुख अनुपसिंग, चाटे शिक्षण समूहाचे संचालक प्रा. भारत खराटे (कोल्हापूर विभाग), एमआयटी एडीटी युनिव्हर्सिटी पुणेचे डॉ. उल्हास माळवदे, भारती विद्यापीठ डिम्ड युनिव्हर्सिटी पुणेच्या प्रा. डॉ. मंजुश्री कदम, दै. 'पुढारी'चे सहायक समूह सरव्यवस्थापक अमित डिक्कर, दै. 'पुढारी'चे सरव्यवस्थापक (ऑपरेशन्स) राजेंद्र मांडवकर आदी उपस्थित होते.

### प्रेशरला पॅशनमध्ये बदला : भोसले



संजय घोडावत विद्यापीठाचे व्यवस्थापकीय संचालक विनायक भोसले म्हणाले, प्रत्येकाला दृष्टी आहे, परंतु दूरदृष्टी नसते. दूरदृष्टी नसेल तर व्यक्ती दिशाहीन होते. विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचार करून करिअर निवडावे. ध्येय निश्चित झाल्यावर त्यादृष्टीने वाटचाल विद्यार्थ्यांनी करावी. जीवनात धोका पत्करल्याशिवाय यशस्वी करिअर होऊ शकत नाही. किती मोठे झाले तरी आई-वडिलांना विसरू नका. आयुष्याचे व्हिजन खूप मोठे ठेवा. पाय जमिनीवर ठेवून काम करा. प्रेशरला पॅशनमध्ये बदलून यशस्वी होण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी करावा. करिअर निवडताना पालकांनी विद्यार्थ्यांना मदत करावी. जे करायचे ते मजेत आनंदी राहिल्यास यशस्वी होता येईल. मला सर्व काही येते असे न समजता आयुष्यभर विद्यार्थ्यांनी शिकत राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 1 MAY 202_
लोकमत

# विद्यापीठात 'मिशन लाईफ कॅम्पेन' सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : जागतिक शाश्वत विकासाच्या प्रक्रियेत सुसंगत ई-कचरा व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाचा इलेक्ट्रॉनिक्स अधिविभाग आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्रातर्फे आयोजित 'मिशन लाईफ कॅम्पेन'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. कामत म्हणाले, इलेक्ट्रॉनिक वस्तू, मोबाइल आदी वाढत्या सुखसोयीच्या साधनांमुळे ई-कचऱ्याचे प्रमाणही जागतिक स्तरावर वाढत आहे. आपल्या देशात अशा प्रकारच्या कचऱ्याच्या व्यवस्थापनाचे मोठे आव्हान उभे आहे. त्यासाठी योग्य मार्ग काढणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने ई-कचरा व्यवस्थापनविषयक प्रचार, प्रसारासाठी विद्यापीठाने अभियान हाती घेतले आहे.

कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, ई-कचऱ्याचे वाढते प्रमाण मानवासह पर्यावरणासाठीही घातक असल्याचे सांगितले. कुलगुरू डॉ. कामत आणि कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या हस्ते ई-कचऱ्याचे संकलन टाकीमध्ये संकलित केला. पर्यावरण संवर्धन आणि ई-कचरा विषयावरील ऑनलाइन पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. कबीर खराडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. पवन गायकवाड, आनंद खामकर, आशिष घाटे, दिनेश उथळे, शरद पाटील, डॉ. कविता वड्राळे, डॉ. किशोर खिलारे, शरद पाटील, उदय पोवार, माऊली पांढरे, संतोष वंगार, विनोद लोखंडे आदी उपस्थित होते. केंद्राचे संचालक डॉ. मुरलीधर भानारकर यांनी स्वागत केले. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2020
जनप्रवास

# विद्यापीठाच्या विविध ८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. ३० मेरोजी विविध ३९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने ६७ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. सदर परीक्षांसाठी ५,६८५ विद्यार्थी होते. ३० मे रोजीरोजी विविध ८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले. आजअखेर ५४० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर केले. या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा-या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. ३० मेरोजी सदर पथकाकडून कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातून कोणत्याही गैरप्रकाराची नोंद परीक्षा प्रमाद समितीतर्फे करण्यात आली नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 MAY 2026
पुढारी

Estd: 1962

"A++" Accredited by NAAC (2021) with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## ADVERTISEMENT NO. 04/2026 & 05/2026

Applications are invited for the posts of Professor of Bank of India Chair and Professor of Bhagwan Mahavir Chair in the prescribed form available online on Shivaji University website www.unishivaji.ac.in (URL www.unishivaji.ac.in/recruitments).

| Sr. No. | Advertisement No. | Chair |
|---|---|---|
| 1. | 04/2026 | Bank of India Chair |
| 2. | 05/2026 | Bhagwan Mahavir Chair |

The details of post, qualifications, age, pay, and emoluments, process of online application form and the instructions therein etc. are available on the university website www.unishivaji.ac.in (URL www.unishivaji.ac.in/recruitments).

- Interested candidates may apply Online on or before 30/06/2026 upto 12.00 midnight.
- Last date for submission of hard copies of application form is 07/07/2026 up to 6.00 p.m. in the University office.

**Kolhapur.**
**Date: 30/05/2026**

**Dr. V. N. Shinde**
**Registrar**